| | | |
|---|---|---|
| **इयत्ता: दहावी** | पहिली घटक चाचणी | **विषय: मराठी** |
| **गुण: 20** | | **वेळ: 1 तास** |

**प्रश्न १ ला: खालील बहुपर्यायी प्रश्न सोडवा** **(5 गुण)**

उतारा वाचून सूचनांनुसार कृती करा.

**(१) आकलन** **(२ गुण)**

तक्ता पूर्ण करा

| | |
|---|---|
| आगळची वैशिष्ट्ये कोणती आहेत? | |
| | |
| | |
| | |

आमची ढाळज म्हणजे गावाचं वर्तमानपत्र होतं आणि आजी त्याची संपादक होती, तर सगळ्या बातम्या तिथं यायच्या. त्यांची शहानिशा व्हायची न् मग त्या गावभर जायच्या. कडुसं पडायच्या आधी ही मैफिल मोडायची. माणसांची वेळ झाली. की म्हातारीची ढाळज सुटायची. माणसं ढाळजंत बसायची. रात्री आठच्या दरम्यान ढाळांचा दरवाजा लागला आणि एकदा आतनं आगळ टाकली, की वाडा शांत व्हायचा. ही आगळ दरवाजाला लावणं किंवा ती काढणं म्हणजे आमच्यासाठी दिव्य असायचं. मुळात ही सहा फुटांची लांब आणि पाऊण फूट रुंद अशी सागवानी आगळ एका भिंतीतल्या देवळीत आरपार जायची. ती आरपार घालवून दरवाजा उघडणं किंवा तिच्या तोंडाला असणाऱ्या पितळी वाघाच्या जबड्यातील कडीला हात घालून ती बाहेर ओढणं व समोरच्या भिंतीतल्या देवळीत ढकलणं फार अवघड गणित होतं. ही आगळ म्हणजे दरवाजाचं, पर्यायाने वाड्याचं भरभक्कम संरक्षक कवच होतं.

**(२) चौकटी पूर्ण करा.** **(१ गुण)**

1. लेखकाच्या गावचं वर्तमानपत्र : [ ]

2. त्या वर्तमानपत्राचे संपादक : [ ]

**(३) स्वमत / अभिव्यक्ती :** **(२ गुण)**

'आमची आजी म्हणजे गावाचं वर्तमानपत्र होतं, ' या वाक्याचा तुम्हांला कळलेला अर्थ लिहा.

**प्रश्न २ रा: पुढील कवितेच्या आधारे दिलेल्या सूचनांनुसार कृती करा: (५ गुण)**

**(१) आकृतिबंध पूर्ण करा: (२ गुण)**

सभेत या दोन गोष्टी करू नये

श्रोतीं व्हावें सावधान। आतां सांगतों उत्तम गुण । जेणें करितां बाणे खुण । सर्वज्ञपणाची ॥१॥

वाट पुसल्याविण जाऊं नये । फळ ओळखिल्याविण खाऊं नये । पडिली वस्तु घेऊं नये । येकायेकीं ॥२॥

जनीं आर्जव तोडूं नये । पापद्रव्य जोडूं नये । पुण्यमार्ग सोडूं नये । कदाकाळीं ॥३॥

तोंडाळासीं भांडों नये । वाचाळासीं तंडों नये । संतसंग खंडूं नये । अंतर्यामीं ॥४॥

आळसें सुख मानूं नये । चाहाडी मनास आणूं नये । शोधिल्याविण करूं नये । कार्य कांही ॥५॥

सभेमध्यें लाजों नये । बाष्कळपणें बोलों नये । पैज होड घालूं नये । कांहीं केल्या ॥६॥

कोणाचा उपकार घेऊं नये । घेतला तरी राखों नये । परपीडा करूं नये । विश्वासघात ॥७॥

व्यापकपण सांडूं नये । पराधेन होऊं नये । आपलें वोझें घालूं नये । कोणीयेकासी ॥८॥

सत्यमार्ग सांडूं नये । असत्य पंथें जाऊं नये । कदा अभिमान घेऊं नये । असत्याचा ॥९॥

अपकीर्ति ते सांडावी। सत्कीर्ति वाडवावी । विवेकें दृढ धरावी । वाट सत्याची ॥१०॥

**(२) खालील विधाने सत्य की असत्य ते लिहा. (१ गुण)**

अ) व्यापकपणा केव्हाही सोडू नये.

आ) तोंडाळ व्यक्तीला तोंड देत राहावे.

**(३) 'उत्तम पुरुष लक्षणे एक उत्तम माणूस घडवू शकतात' या विधानाबाबत तुमचे मत लिहा'. (२ गुण)**

प्रश्न ३ रा: व्याकरण आणि भाषाभ्यास (५ गुण)

**(१) योग्य जोड्या लावा (२ गुण)**

| सामासिक शब्द | समासाचे नाव |
|---|---|
| १) ऊनपाऊस | द्विगू समास |
| २) सप्तस्वर्ग | वैकल्पिक द्वंद्व समास |
| ३) बरेवाईट | कर्मधारय समास |
| ४) पितांबर | इतरेतर द्वंद्व |

**(२) कंसातील शब्द योग्य ठिकाणी भरून तक्ता पूर्ण करा :** **(२ गुण)**

(शिष्टाई, धारदार, बेशक, उपहार)

| उपसर्गघटीत शब्द | प्रत्ययघटीत शब्द |
|---|---|
| (१) ________________ | (१) ________________ |
| (२) ________________ | (२) ________________ |

**(३) समानार्थी शब्द लिहा** **(१ गुण)**

1. रात्र -
2. वाट -

**प्रश्न ४ था: पत्रलेखन - पुढील जाहिरात वाचा आणि सूचनेनुसार कृती लिहा** **(५ गुण)**

**मनाली 2021**

चला मनाली, नुसतं बघायला नव्हे, तर पूर्णपणे अनुभवायला!

बाराही महिने सौंदर्याचा नजराणा!

पहिल्या 100 पर्यटकांमधील लकी पर्यटक बना

आणि मनालीची सहल पूर्णपणे मोफत अनुभवा!!

राजमाता पर्यटन,

टिळक रोड, खोपोली – ४१० २०३

ई-मेल ID : abc@xxxx.com संपर्क – ८६xxxxxxxx

| पर्यटक या नात्याने | मित्र या नात्याने |
|---|---|
| राजमाता पर्यटन, टिळक रोड, खोपोली या संस्थेकडे मनाली सहल माहितीपत्रकाची मागणी करणारे पत्र लिहा. | दिव्यांग मित्राला मनाली पर्यटनाला नेल्याबद्दल तुमच्या मित्राचे अभिनंदन करणारे पत्र लिहा. |